# जाहिर नोटीस
# रत्नागिरी येथील जिल्हा न्यायालयात,

या जाहिर नोटीसीद्वारे असे कळविणेत येते की,

जिल्हा न्यायालय, रत्नागिरी यांचे अधिपत्याखालील जिल्हा न्यायालय–१, खेड, दिवाणी न्यायालय, क.स्तर, देवरुख, दिवाणी न्यायालय, क.स्तर, राजापुर येथील शार्प कंपनीची (शार्प ए.आर.६०२०एन) झेरॉक्स मशीन व दिवाणी न्यायालय व.स्तर, रत्नागिरी येथील (शार्प एम.एक्स.एम.२६५ एन.व्ही) झेरॉक्स मशिनचा वार्षिक देखभाल करार करणे आवश्यक असल्याने याद्वारे दरपत्रके मागविणेत येत आहेत.

तरी ज्या कोणा व्यक्ती अथवा संस्थेस वर नमुद केलेप्रमाणे जिल्हा न्यायालय, रत्नागिरी यांचे अधिपत्याखालील जिल्हा न्यायालय–१, खेड, दिवाणी न्यायालय, क.स्तर, देवरुख व दिवाणी न्यायालय, क.स्तर, राजापुर येथील शार्प कंपनीची (शार्प ए.आर. ६०२०एन) झेरॉक्स मशीन व दिवाणी न्यायालय व.स्तर, रत्नागिरी येथील (शार्प एम.एक्स. एम.२६५ एन.व्ही) झेरॉक्स मशीनचा वार्षिक देखभाल करार करणे शक्य असेल, त्यांनी आपले दरपत्रक खालील अटी व शर्तीस अधीन राहून ही नोटीस जिल्हा न्यायालयाचे नोटीस: बोर्डवर प्रसिध्द झाल्यापासून आठ दिवसांच्या आत म्हणजेच दिनांक ०६/०५/२०२४ रोजी सायं. ५.०० वाजेपर्यंत सहाय्यक अधीक्षक (वित्त), जिल्हा न्यायालय, रत्नागिरी येथे समक्ष आणून द्यावीत.

## दरपत्रकांबाबत अटी व शर्ती

१. दरपत्रक आवश्यक त्या संपूर्ण तपशीलासह व तारखेसह मा.प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रत्नागिरी यांचे नावे असावे, त्यामध्ये कर व वस्तूंची किंमत इत्यादी बाबी स्वतंत्र नमुद कराव्यात, तसेच दरपत्रकामध्ये किंवा लेटर हेडवर GST क्रमांक नमुद करावा व पॅनकार्डची झेरॉक्स प्रत दरपत्रकासोबत सादर करावी. तसेच ज्या पुरवठादाराचे दरपत्रक मंजूर होईल त्यांनी स्वत:चे पॅनकार्डची सत्यता या कार्यालयाकडून पडताळणी करणे बंधनकारक राहील.

२. झेरॉक्स मशीनबाबत तक्रार दिलेनंतर त्वरीत या न्यायालयात हजर होवून तक्रारीचे निवारण करावयाचे आहे अथवा संबंधित मशीनकरिता आवश्यक कंझ्युमेबल पार्टची त्वरित माहिती कार्यालयाला देणेची आहे.

३. जर एखाद्या तक्रारीचे निवारण आपण दिलेल्या अटी व शर्तीच्या कालावधीत झाले नाही तर दुस—या सर्व्हीस प्रोव्हायडरला सदरची झेरॉक्स मशीन दुरुस्तीसाठी कळविले जाईल व त्यासाठी येणारा खर्च हा आपल्या देखभाल खर्चामधून वजा केला जाईल.

४. तक्रार निवारण करणेसाठी प्रशिक्षीत तज्ञाला पाठविणे आवश्यक आहे. तसेच त्याला झेरॉक्स मशीनबाबतचे पुरेसे ज्ञान असणे आवश्यक आहे.

५. जेव्हां सर्व तक्रारीचे निवारण होईल तेव्हाच वार्षिक देखभालीचा खर्च देणेत येईल. सदरचा खर्च हा कर्यालयासाठी पुरविणेत आलेला निधी जेव्हा उपलब्ध होईल तेव्हा देणेत येईल.

६. जर आपणाशी केलेला वार्षिक देखभाल करार हा समाधानकारक नसेल तर सदर वार्षिक देखभाल करार हा कोणतीही आगावू नोटीस न देता रद्द करणेत येईल.

७. वार्षिक देखभाल कराराचा खर्च हा त्रैमासिक पद्धतीने (Quarterly Basis) अदा करणेत येईल. तसेच देखभालीसाठी आगावू खर्च देण्यात येणार नाही.

८. अपवादात्मक परिस्थितीत दरपत्रक नाकारण्याचा अधिकार मा.प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रत्नागिरी यांना राहील.

आज दिनांक २९/०४/२०२४ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

DISTRICT COURT OF RATNAGIRI
सत्यमेव जयते
डीस्ट्रीक्ट कोर्ट, रत्नागिरी

दिनांक— २९/०४/२०२४

प्र. प्रबंधक,
जिल्हा न्यायालय, रत्नागिरी

म.जा.क्र. वित्त/ २५७४ /२०२४
जिल्हा न्यायालय, रत्नागिरी
दिनांक:— २९/०४/२०२४

<u>प्रत नोटीस बोर्डवर व वेबसाईटवर प्रसिध्दीसाठी—</u>

१. सहाय्यक अधीक्षक (वित्त), जिल्हा न्यायालय, रत्नागिरी
२. जिल्हा संगणक प्रणाली प्रशासक, जिल्हा न्यायालय, रत्नागिरी.